ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाविलास, पुणें ४.

वर्ष १९ | पुणें, बुधवार तारीख २० मे, १९५३ | अंक २०

## विविध माहिती

**बंगलोरचा सन्मान**—आशिया आणि अतिपूर्व भागासाठी काम करणाऱ्या संयुक्त-राष्ट्रसंघटनेच्या आर्थिक कमिशनची मुख्य कचेरी लवकरच बंगलोर शहरीं येणार आहे. सध्या संस्थेची मुख्य कचेरी बँकॉक ( सयाम ) येथें आहे. कचेरीसाठी एक प्रशस्त इमारत शोधण्याची खटपट म्हैसूरचें सरकार करीत आहे.

**रत्नागिरी जिल्ह्यांत काथ्याचा कारखाना**—रत्नागिरी जिल्ह्यांतील वेंगुर्लें येथें काथ्या काढणें व कांतणें ह्यांचीं केंद्रें काढण्याचा भारतीय सरकारचा विचार आहे. त्याशिवाय काथ्याचा एक कारखानाहि काढण्यांत येणार आहे. ही योजना तूर्त एक वर्षापुरती असून तीसाठी ८२,००० रुपये खर्च येईल.

**पुस्तकें छापण्याचा डोईजड खर्च**—इंग्लंडमध्यें पुस्तकें छापण्याचा धंदा फार खर्चाचा झाला आहे. त्यामुळें बहुतेक प्रकाशक १,००,००० शब्दांपेक्षा अधिक शब्द असलेलें पुस्तक छापण्यास धजत नाहींत. पुस्तक तसेंच चांगलें असेल अगर त्याचा लेखक प्रथितयश असेल तरच एवढें पुस्तक प्रसिद्ध करणें शक्य असतें.

**भारत-ब्रह्मदेश व्यापार**—ब्रह्मदेश सरकारचें एक प्रतिनिधी-मंडळ भारताशीं व्यापारी सौदा करण्यासाठी लौकरच येणार आहे. मंडळाचे प्रमुख ब्रह्मदेशाचे अर्थमंत्री आहेत. भारताशीं व्यापारी बोलणीं करून २० कोटी रुपयांचा माल विकत घेण्याचा करार करण्याची ब्रह्मदेशच्या सरकारची इच्छा आहे.

**भारतांतील परकीय कंपन्या**—जुलै, १९४७ ते डिसेंबर, १९५२ पर्यंत ६० परकीय मालकीच्या कंपन्या भारतीय नागरिकांनीं विकत घेतल्या व १२ कंपन्यांनीं आपले व्यवहार बंद केले. ह्याच कालांत परदेशांतून ८·३ कोटी रुपये परदेशीय भांडवल भारतांत गुंतविण्यांत आलें.

**पार्लमेंटच्या सभासदांना रेल्वे-पास**—पार्लमेंटच्या सभासदांना सभागृहाच्या कामासाठी जाण्या-येण्याला भत्ता द्यावा; कीं पहिल्या अगर दुसऱ्या वर्गाचे पास द्यावे ह्यासंबंधीं विचार करण्यासाठी एक कमिटी नेमण्यांत आली होती. कमिटीनें भत्ते देण्याचें बंद करून पासेस देण्यांत यावे, असा निर्णय दिल्याचें कळतें.

**ब्रिटिश नटांची दैना**—सध्यां ब्रिटिश नटांना कठीण दिवस आले आहेत. कोठल्याहि एका आठवड्यांत ४० टक्के नट बेकार असतात आणि नामांकित नटांना सुद्धां वर्षांतून ४ महिनेच काम मिळतें. ब्रिटिश नटांची 'इक्विटी' नांवाची एक संघटना असून त्या संघटनेचे १०,००० सभासद आहेत. संघटनेमार्फत सर्वांना काम मिळणें अशक्य झालें आहे.

**पाकिस्तानला सवलत**—पाकिस्तानला भांडवली माल व यंत्रसामुग्री पुरवून त्याबद्दलची किंमत अवधीनें घेण्याचें जपाननें नुकतेंच कबूल केलें होतें. आतां इंग्लंड आणि इतर कांहीं युरोपीय राष्ट्रेंहि ह्याच अटीवर वरील माल पुरविण्यास तयार झालीं आहेत.

**अणुबाँबचा हल्ला झाला तर**—अणुबाँबचा हल्ला झाला तर भोजनाची गैरसोय होऊं नये म्हणून लंडनमधील एका एंजिनिअरिंग कंपनीनें २४ फूट लांबीच्या मोटार लॉरींत ५०० माणसांना पुरेल इतकें अन्न शिजविण्याची सोय केली आहे.

**धर्मविषयक कलेचें प्रदर्शन**—ब्रिटनमध्यें धर्मविषयक कलेचें एक प्रदर्शन नुकतेंच भरविण्यांत आलें होतें. प्रदर्शनांत तैलचित्रें, पुतळे, कांचेवरील कलाकुसरीचीं कामें, रेशमाच्या वस्तू, इत्यादि १,४०० प्रकारच्या वस्तू मांडण्यांत आल्या होत्या. प्रदर्शनांत १४ राष्ट्रांनीं भाग घेतला. त्यांत भारतहि सामील होता.

**धुराच्या काजळीपासून सिमेंट**—जपानमधील एका विजेच्या कंपनीनें कारखान्यांच्या चिमण्यांतून सांठलेल्या काजळीपासून सिमेंट तयार करण्याचे प्रयत्न चालविले आहेत. ही काजळी जमा करून व वाळवून त्यापासून सिमेंटसारखा पदार्थ तयार करण्यांत येणार आहे. चालू सालीं या पद्धतीनें ५,००० टन सिमेंट तयार होईल.

**टेलिफोनच्या कॉलसची संख्या**—भारताच्या राजधानीमधून १९५२-५३ सालीं आतांपर्यंत सर्वांत अधिक म्हणजे १७९ लाख टेलिफोन कॉल्स करण्यांत आले. त्यामुळें २७,४३,००० रुपयांचें उत्पन्न झालें. दिल्लीहून मुंबईला रोज सुमारें ५५० कॉल्स करण्यांत येतात. मुंबईच्या खालोखाल उत्तर-प्रदेशांतील हपूर ह्या गांवाला टेलिफोन्स करण्यांत येतात. हपूर हे गव्हाच्या व्यापाराचें फार मोठें केंद्र आहे.

**शिक्षणासाठी ७ लाखांचा ट्रस्ट**—मुंबईच्या महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष श्री. के. एच्. कब्बूर आणि त्यांच्या पत्नी ह्यांनीं शिक्षणाला उत्तेजन देण्यासाठी ७ लाख रुपयांचा एक ट्रस्ट केला आहे. महाराष्ट्र व कर्नाटक ह्यामधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या व कर्जें देण्यासाठी ट्रस्टचा उपयोग करण्यांत येईल. त्यांशिवाय संशोधनास मदत करण्याच्या कामीं आणि शैक्षणिक संस्थांना मदत करण्यासाठीहि ट्रस्टचा उपयोग करतां येईल.

**भिकाऱ्यांची ट्रेड युनिअन**—मिलन ( इटली ) शहरांतील भिकाऱ्यांनीं आपली ट्रेड युनिअन स्थापन केली असून तिला सरकारी मान्यता मिळविण्याची खटपट चालविली आहे. भिकाऱ्यांना मेयॉरनें परवाने द्यावे आणि बिगर-परवाना भीक मागणाऱ्यांना बंदी करण्यांत यावी, अशी त्यांची मागणी आहे.

### रॉकफेलर फौंडेशननें केलेली मदत

सार्वजनिक संस्थांना देणग्या देणाऱ्या प्रसिद्ध रॉकफेलर फौंडेशनचा ४० वा वर्षदिन नुकताच साजरा झाला. ह्या संस्थेनें ९२ निरनिराळ्या देशांना आतांपर्यंत आर्थिक मदत केली आहे. भारतामधील संस्थांनाहि अशी मदत मिळालेली आहे. मनुष्यजातीच्या सुखासाठी प्रयत्न करणें हें फौंडेशनचें ध्येय असून त्या कार्यासाठी आतांपर्यंत ४९ कोटी डॉलर्सच्या देणग्या संस्थेनें दिलेल्या आहेत. चालू वर्षाच्या पहिल्या तिमाहींत फौंडेशननें ३७,००,००० डॉलर्सच्या देणग्या जाहीर केल्या. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च ह्या संस्थेला फौंडेशननें १,२१,००० डॉलर्स मदतीदाखल दिले आहेत. भारतामधील वैद्यकीय कॉलेजांतून शिक्षण देण्यासाठी पदवी परीक्षेनंतरच्या अभ्यासासाठी वरील रकमेचा विनियोग करण्यांत यावयाचा आहे. भारतामधील भाषाविषयक प्रश्नांचा प्राथमिक अभ्यास करून नंतर एक परिषद् भरविण्यासाठी पुणें येथील डेक्कन कॉलेजला १०,००० डॉलर्सची मदत करण्यांत आली आहे. म्हैसूर येथील विद्यापीठाला ३,९०० डॉलर्स देण्यांत आले आहेत. विद्यापीठांतील प्राध्यापकांनीं शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाचा अमेरिकेंत जाऊन अभ्यास करावा म्हणून वरील देणगी देण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें अलीगढ विद्यापीठाला कलाविषयक शिक्षण देण्यासाठी जरूर तें साहित्य विकत घेतां यावें म्हणून १,५०० डॉलर्स देण्यांत आले आहेत. त्याशिवाय म्हैसूर संस्थानांतील हिवतापाला पायबंद घालण्यासाठी आणि दोषी तापाचें संशोधन करण्यासाठीहि फौंडेशननें आर्थिक साह्य केलें आहे. फौंडेशनची अतिपूर्वेकडील कार्याची मुख्य कचेरी बंगलोर येथें आहे.

---

### महाराष्ट्र बँकेच्या इमारतीच्या उत्कृष्टपणाचे वाटेकरी

किताब बिल्डिंगमध्यें पहिल्या मजल्यावरील एक खोलींत बँकेनें संसारास प्रारंभ केला. प्रत्यक्ष व्यवहार सुरू झाल्यावर ती त्याच इमारतींत तळमजल्यावर आली व तेथें तिनें दोन खोल्या व्यापल्या. ही जागा लवकरच अपुरी पडूं लागून शेजारच्या काकाकुवा मॅन्शनमध्यें बँक नेण्यांत आली. तेथें वाढत्या विस्ताराप्रमाणें तिनें अधिकाधिक जागा घेतली आणि आतां ती स्वतःच्या प्रशस्त इमारतींत गेली आहे. १९४२ सालीं इमारतीसाठीं जागा घेतली होती, तिचेवरील इमारत आतां पुरी झाली आहे. ह्या इमारतीच्या कामीं खालील लोकांची बहुमोल मदत झाली आहे:—

आर्किटेक्ट—श्री. यू. एम. आपटे

कॉन्ट्रॅक्टर्स—मेसर्स के. आर. साठे अँड सन्स

स्टील स्ट्रक्चर—मेसर्स एस. एस. मराठे अँड कं.

सल्लागार इलेक्ट्रिकल इंजिनिअर—श्री. डी. व्ही. पोतदार, बी.ई. (इले., मॅके.)

विजेचें इन्स्टॉलेशन—मेसर्स डेक्कन इलेक्ट्रो वर्क्स, कोल्हापूर.

इलेक्ट्रिक लिफ्ट—मेसर्स मेरट अँड स्कॉट लि.

लिफ्टचें इन्स्टॉलेशन—मेसर्स जॉन फ्लेमिंग अँड कं. लि.

फरशी काम—मेसर्स भारत टाइल्स अँड मार्बल लि.

कौंटर व फर्निचर—मेसर्स एस. जी. गोखले आणि कं.

सेफ डिपॉझिट व्हॉल्ट—मेसर्स हैद्राबाद अलविन मेटल वर्क्स लि.

डायरेक्टरांची बिल्डिंग कमिटी—श्री. डी. के. साठे, श्री. एस. जी. मराठे व श्री. एन्. जी. पवार.


# दि सांगली बँक लिमिटेड

## सांगली

(स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक)

## मुख्य ऑफिस : सांगली

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये १०,००,००० |
| वसूल भांडवल | रुपये ४,५०,००० |
| रिझर्व व फंडस् | रुपये ४,९०,००० |
| वर्किंग फंडस् | रुपये एक कोटीवर |

: शाखा :

मुंबई, शहापूर, तेरदळ, रबकवी, शिरहट्टी, मंगळवेढें, कवठें, कराड, उगार, विलिंग्डन कॉलेज, इचलकरंजी.

सांगली येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था आहे.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. आर. व्ही. देशमुख, B. A., B. Litt. (Oxon) (चेअरमन) कलेक्टर, साउथ सातारा.

(१) श्री. नेमचंद रावजी शहा (२) श्री. भूपालराव अनंत आरवाडे (३) श्री. पुरुषोत्तम गोकुळदास, (४) श्री. गुंडप्पा बाबाजी आरवाडे, (५) श्री. तात्यासाहेब श्रीमंधर आरवाडे, (६) श्री. मारुतीराव रामचंद्र जाधव.

एम्. के. गुप्ते,
एम्. ए., सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर

# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखा:—संकेश्वर, होसूर (पा. शहापूर), गोकाक, कँप (बेळगांव), वेंगुर्ले, मालवण, नंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिकोडी, नरगुंद, शिरोडा, चिपळूण, कणकवली, निपाणी, बैलहोंगल, मिरज, अथणी, देवगड, सावंतवाडी, ठळकवाडी (बेळगांव), सौंदत्ती.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. १,९०,००० |
| ठेवी | रु. ७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ९२,९३,००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतीमध्यें अद्ययावत् पद्धतीचा सेफडिपॉझिट व्हॉल्ट लौकरच सुरू होत आहे.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एम्. जी. हेरेकर, चेअरमन. ए. आर. नाईक, मॅनेजिंग डायरेक्टर. एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. २० मे, १९५३



संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## जागतिक उत्पादन वाढलें, पण आपली दुर्दशा कायम

दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वीच्या काळाशीं तुलना करतां जगांतील शेतीचें उत्पन्न बरेंच वाढलें आहे. गहूं, मका, बार्ली इत्यादि धान्यांच्या उत्पादनाचें प्रमाण युद्धपूर्व कालांतील १९३४ ते १९३८ च्या दरम्यानच्या सरासरीपेक्षा पुष्कळ वाढल्याचें दिसून येतें. गव्हाच्या उत्पादनांत १९५१ सालीं वरील सरासरीच्या मानानें ११ टक्के वाढ झाली. मक्याच्या उत्पादनांत २० टक्के वाढ झाली. बार्लीच्या उत्पादनांतहि २० टक्के वाढ झाली. तांदुळाच्या उत्पादनांत मात्र कांहींच वाढ झालेली दिसून येत नाहीं. १९५१ सालीं कापसाच्या उत्पादनांत १४ टक्के वाढ झाली. लोकर आणि पशुधन ह्या दोन बाबींतहि वाढीची नोंद करण्यांत आली आहे. १९३१ सालापासून जीं दोन दशकें गेलीं त्यांत जगांतील औद्योगिक उत्पादन तिपटीपेक्षाहि अधिक वाढल्याचें दिसून येतें. पोलादाच्या उत्पादनांत चौपट वाढ झालेली आहे. कोळशाच्या उत्पादनांत ६५ टक्के वाढ झालेली आहे. पेट्रोलच्या उत्पादनांत २२९ टक्के वाढ झालेली असून विजेच्या निर्मितींत २८८ टक्के वाढ झालेली आहे. १९२९ ते ३२ पर्यंत अमेरिकेंत जी मोठी आर्थिक मंदी आली होती, त्यावेळीं जितक्या मोटारी निर्माण केल्या जात होत्या त्यापेक्षा तिप्पट मोटारी आज तयार होत आहेत. १९३८ सालाच्या मानानें आंतरराष्ट्रीय व्यापारांत ३½ पट वाढ झालेली आहे. व्यापार वाढल्यामुळें रेल्वेच्या व जहाजांच्या वाहतुकींतहि वाढ झालेली आहे. जगांतील लोकांचें आरोग्यहि सुधारलेलें आहे. १९३०-३४ मधील बालमृत्यूंची संख्या लक्षांत घेतल्यास ही गोष्ट सहज लक्षांत येते. लोकांना दरडोई दरदिवशीं मिळणाऱ्या अन्नांतहि सुधारणा झालेली आहे. निदान युद्धपूर्व कालाइतकें तरी अन्न बहुतेक लोकांना मिळत आहे.

दरमाणशीं दर दिवशीं अन्नाच्या जितक्या कॅलरी लोकांना मिळतात त्या मानानें निरनिराळ्या राष्ट्रांचे गट पाडण्यांत आले आहेत. ३,००० कॅलरीज अगर अधिक मिळणाऱ्या राष्ट्रांत आयर्लंड, ऑस्ट्रेलिआ, न्यूझीलंड, कॅनडा, स्वीडन, फिनलंड, युनायटेड स्टेटस्, अर्जेंटायना, नॉर्वे, डेनमार्क, इंग्लंड, इत्यादि राष्ट्रें आहेत. २,८००-२,९९९ कॅलरीज मिळणाऱ्या राष्ट्रांत युराग्वे, बेल्जम-लक्झेंबर्ग व प. जर्मनी येतात. २,६०० ते २,७९९ कॅलरीज मिळणाऱ्या राष्ट्रांत फ्रान्स, ऑस्ट्रिआ, क्यूबा, झेकोस्लोव्हाकिआ, इस्राएल, द. आफ्रिका व पोलंड हीं राष्ट्रें येतात. २,४०० ते २,५९९ कॅलरीज मिळणाऱ्या राष्ट्रांत ग्रीस, तुर्कस्थान, सायप्रस, व इटली हीं राष्ट्रें येतात. २,२०० ते २,३९९ कॅलरीज मिळणाऱ्या राष्ट्रांत चिली, ब्राझिल, इजिप्त, कोलंबिआ, मॉरिशस व व्हेनेझुएला हीं राष्ट्रें येतात. २,००० ते २,१९९ कॅलरीज मिळणाऱ्या राष्ट्रांत जपान, सीलोन, इंडोचायना व पाकिस्तान हे देश येतात आणि २,००० कॅलरीज मिळणाऱ्या राष्ट्रांत ब्रह्मदेश आणि भारत हे देश येतात. जगांत एकंदरीनें धनोत्पादनांत वाढ झालेली दिसत असली तरी त्याच्या विभाजनांत किती आणि कसा फरक आहे हें आहारविषयक वरील माहितीवरून चांगलें लक्षांत येतें. भारतासारख्या कांहीं देशांतून तर आज युद्धपूर्व कालापेक्षाहि कमी शक्ति पुरविणारें अन्न लोकांना मिळत आहे. कोणत्याहि देशाच्या आहारावरून त्याच्या खऱ्या आर्थिक स्थितीची कल्पना अचूक बांधतां येते. भारतामधील शेतकऱ्याच्या एकूण खर्चांत अन्नविषयक खर्च हा बराच असतो. म्हणजे असें कीं, ज्या मानानें दारिद्र्य अधिक त्यामानानें अन्नावरील खर्च अधिक असतो. हाच नियम इतर देशांच्या बाबतींतहि लागू होतो. भारतामधील शेतीचें व उद्योगधंद्यांचें उत्पादन प्रगत देशांच्या मानानें फारच कमी असल्यानें अन्नावर अप्रमाण अधिक खर्च होऊन सुद्धां भारतामधील लोकांना पुरेसें सकस अन्न मिळत नाहीं ही वस्तुस्थिति आहे.

---

## प्रा. नारळकरांचा सत्कार

प्रा. ना. ग. ऊर्फ नानासाहेब नारळकर ह्यांच्या षष्ट्यब्दिपूर्तीनिमित्त मोठा सत्कार समारंभ नारळकर सत्कार समितीमार्फत पुणें येथें १७ मे रोजीं करण्यांत आला. स्वदेशीचा पुरस्कार त्यांनीं केवळ प्रचारानेंच नव्हे, कृतीनें व त्याहिपेक्षा महत्त्वाचें म्हणजे तरुण पिढींत जागृति व तळमळ निर्माण करून स्वाभिमानी व निष्ठावंत अशी प्रभावळ निर्माण करून केला. नू. म. वि. तील विद्यार्थीभांडारानें कितीतरी तरुणांना स्वावलंबनाचे धडे दिले व त्यांचा आत्मविश्वास जागृत केला. स्वदेशी प्रेमाचें महत्त्व अद्यापहि कायम आहे व त्यासाठीं कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत हें त्यांनीं "व्यापारी महाराष्ट्रां"तील आपल्या संदेशांत दाखवून दिलें आहे. "आपण स्वदेशीच माल घेतला. तर भारताचा परराष्ट्रीय व्यापार कसा वाढेल ?" असें म्हणणारे विद्वान आजहि आढळतात म्हणूनच प्रा. नारळकरांचा संदेश सर्वत्र पोंचविण्याची अद्यापहि गरज आहे. प्रा. नारळकरांचा आत्मविश्वास अंगीं बाणण्याचा प्रयत्न तरुणांनीं केला पाहिजे. "आम्हीं महाराष्ट्रीय कोणत्याहि क्षेत्रांत, कोणाहि परदेशियांचे बरोबर, मांडीस मांडी लावून, तोडीस तोड देऊन, बरोबरीचा सामना हमखास करूं." हाच त्यांचा आजच्या महाराष्ट्रास आत्मविश्वासाचा संदेश आहे. "व्यापारी महाराष्ट्रा"स प्रा. नारळकरांकडून प्रारंभापासून स्फूर्ति मिळालेली आहे व त्या पाक्षिकानें प्रा. नारळकरांच्या व्रताचा निरलस पुरस्कार केलेला आहे. त्यांच्या गौरवार्थ "व्यापारी महाराष्ट्रा"नें विशेष अंक काढून उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. प्रा. नारळकरांचें त्यांच्या षष्ट्यब्दिपूर्तीच्या शुभ प्रसंगीं आम्हीं मनःपूर्वक अभिनंदन करतों व त्यांच्या तळमळीचें व परिश्रमांचें चीज अधिकाधिक प्रमाणांत त्यांना पहाण्यास मिळण्यासाठीं त्यांना दीर्घायुरारोग्य चिंतितों.

---

## अमेरिकेचें रहाणीचें मान

अमेरिकन लोकांच्या रहाणीच्या दर्जाविषयीं नॅशनल इंडस्ट्रिअल कॉन्फरन्स बोर्ड ह्या नांवाच्या खाजगी संशोधन संस्थेनें नुकतीच आंकडेवार माहिती गोळा केली होती. ह्या माहितीवरून अमेरिकन जनतेच्या रहाणीविषयीं चांगली कल्पना येते, ती अशीः— अमेरिकेंतील कुटुंबांच्या संख्येपैकी निम्म्या तरी कुटुंबांच्या मालकीचीं रहातीं घरें होतीं. मध्यमवर्गीय कुटुंबांपैकी १/३ कुटुंबांच्या व वरिष्ठ मध्यमवर्गीय कुटुंबांपैकीं १/१० कुटुंबांच्या घरीं मोटारी होत्या. ५ ते १० हजार डॉलर्स वार्षिक उत्पन्नाच्या कुटुंबांना मध्यमवर्गीय आणि १० हजार डॉलर्सपेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांना वरिष्ठ मध्यमवर्गीय ह्या सदरांत घालण्यांत येतें. अमेरिकन लोकांच्या मालकीचे टेलिव्हिजन सेट्स, रेडिओ, रिफ्रिजिरेटर्स व अशाच प्रकारच्या इतर चैनीच्या वस्तू ह्यांची किंमत सुमारें १,५०० कोटी डॉलर्स भरली. ७० टक्के अमेरिकन कुटुंबांचीं बँकेंत खातीं होतीं, अगर तीं सरकारी कर्जरोखे धारण करणारीं होतीं. त्यापैकी निम्म्यापेक्षा अधिक अमेरिकन कुटुंबांची ७,५०० डॉलर्स किंमतीची मालमत्ता होती व १/३ पेक्षा अधिक कुटुंबांची जिंदगी ३०,००० डॉलर्सपेक्षा अधिक होती. १/१० पेक्षाहि कमी अमेरिकन कुटुंबांना कर्जे होतीं. ७५ टक्के अमेरिकन कुटुंबांनीं विम्याचें संरक्षण घेतलेलें होतें. अमेरिकेंतील उपभोग्य धनाची किंमत जवळ जवळ ७५,००० कोटी डॉलर्स भरली. दुसरें महायुद्ध संपल्यापासून अमेरिकेजवळील ह्या धनाची ५० टक्के वाढ झाल्याचें दिसून आलें. युद्धोत्तर कालांत वस्तूंच्या किंमती वाढल्यामुळें ही वाढ झाली. त्याबरोबरच प्रत्यक्ष उपभोग्य वस्तूंच्या संख्येंतहि बरीच वाढ झाली हेंहि खरें. १/३ पेक्षा अधिक अमेरिकन कुटुंबांच्या मालकीची घराशिवाय इतराहि मालमत्ता होती.

---

## भारतांतील विमानतळ व त्यांचें उत्पन्न

भारतांतील एकूण विमानतळांपैकी १८६ विमानतळ मध्यवर्ती सरकारच्या मालकीचे आहेत, १०५ विमानतळांची मालकी राज्य सरकारांकडे आहे आणि १४ विमानतळ खाजगी मालकीचे आहेत. कंपन्यांकडून विमानें उतरविण्यासाठी आणि ठवण्यासाठी घेण्यांत येणारा आकार, जमीन व घरें ह्यांचे भाडेकरूंकडून येणारें भाडें, वीज व पाणी ह्यांच्या वापराबद्दल आकार, चहाचीं दुकानें, गवत, जाहिरात. ह्यांपासून मिळणारें उत्पन्न इत्यादींपासून मध्यवर्ती सरकारला १९५२–५३ मध्यें विदेशी कंपन्यांकडून १४½ लक्ष रु. व हिंदी कंपन्यांकडून ४२½ लक्ष रु. मिळाले.

---

## मध्यवर्ती सरकारनें दिलेल्या कर्जावरील व्याज

दामोदर व्हॅली, हिराकुड, हरेकी, आणि भाक्रा नान्गल या धरण योजनांव्यतिरिक्त इतर कर्जांचे बाबतींत राज्य-सरकारें आपल्या महसूलांतून व्याज देतात. या योजनांच्या बाबतींत संबंधित सरकारांनीं म्हणजे प. बंगाल, बिहार, ओरिसा पंजाब आणि राजस्थान यांनीं मध्यवर्ती सरकारकडून सबंध खर्च भागविण्याइतकी म्हणजे बांधकामाच्या काळांतील व्याजासुद्धां रक्कम मध्यवर्ती सरकारकडून उसनी घेतली आहे. प्रत्येक कर्जाच्या व्याजाचा दर तें देण्यांत आलें त्यावेळीं असलेल्या बाजारांतील परिस्थितीला अनुसरून ठरविण्यांत आलेला आहे.

---

## बेळगांव येथें बँकर्स असोसिएशनची स्थापना

### डॉ. राव ह्यांचे हस्तें उद्घाटन

धी बेळगांव बँकर्स असोसिएशन बेळगांव या संस्थेचा उद्घाटन-समारंभ दिल्लीचे सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉक्टर व्ही. के. आर. व्ही. राव, एम्. ए., पीएच्. डी., डि. लिट्, यांचे हस्तें मंगळवार तारीख ५ मे, १९५१ रोजीं बेळगांवच्या लिंगराज कॉलेज सेंट्रल हॉलमध्यें सायंकाळीं ८ वाजतां मोठ्या थाटानें साजरा झाला. त्याप्रसंगीं सुमारें शंभरचे वर लोक हजर होते.

प्रारंभीं धी बँक ऑफ सिटिझन्सचे चेअरमन श्री. जी. डी. सराफ यांनीं पाहुण्यांचें व निमंत्रितांचें स्वागत करून प्रास्तविक भाषण केलें. "सध्यांचे जगांत संघटित प्रयत्नांशिवाय कोणतेंच कार्य होऊं शकत नाहीं. ह्या दृष्टीनें अनेक मोठ्या शहरीं बँकर्स असोसिएशन्स स्थापन झाली आहेत. बेळगांवसारख्या ठिकाणींहि त्याची अत्यंत आवश्यकता होती व म्हणूनच ही संस्था स्थापन करणेंत आली आहे. ही संस्था बँकांच्या अंतर्गत बाबतींत ढवळाढवळ न करितां फक्त बँकाबँकांत एकजूट व सलोखा निर्माण करणें आणि न्याय्य तक्रारींची रास्त मार्गानें पूर्तता करणें या ध्येयानेंच कार्य करणार आहे. तरी सर्व संस्थांनीं संपूर्ण सहकार्य करावें" अशी विनंति करून व पाहुण्यांना हार अर्पण करून चार शब्द सांगण्याची विनंती केली.

डॉक्टर राव यांनीं संस्थेचें उद्घाटन झाल्याचें जाहीर करून अशी संस्था बेळगांवांत स्थापन झाल्याबद्दल समाधान व्यक्त केलें व कोणतीं कामें संस्थेनें हातांत घ्यावींत याची थोडी कल्पना दिली.

त्यानंतर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को. बँकेचे चेअरमन श्री. उमरगोळ यांनीं समारोप करून व पुन्हां सगळ्यांचे आभार मानून सभा संपल्याचें जाहीर केलें.

---

## अमेरिकेंतून भांडवली मालाची आयात

| वर्ष | कोटी रु. |
|---|---|
| १९४७–४८ | १८ |
| १९४८–४९ | २४ |
| १९४९–५० | २८ |
| १९५०–५१ | १८ |
| १९५१–५२ | २३ |
| १९५२ | १४ |
| १९५२ (एप्रिल–डिसें.) | १४ |

---

## घाऊक किंमतींचा निर्देशांक

भारतांतील घाऊक किंमतींचा निर्देशांक (मूळ प्रमाण ऑगस्ट १९३९ ला संपलेलें वर्ष = १०० धरून) २ मे, १९५३ रोजीं संपलेल्या आठवड्यांत आणखी ०·८ टक्क्यानें वाढून ३९२·६ वर गेला. मागील आठवड्यांत तो ३८९·४ (दुरुस्त) असा होता. मागील महिन्यांतील व वर्षांतील या आठवड्याच्या निर्देशांकांपेक्षा तो अनुक्रमें २·७ व ५·९ टक्क्यांनीं जास्त आहे.

---

**हैदराबादची भूगर्भीय तपासणी**—हैदराबाद राज्याची भूगर्भविषयक पहाणी करण्याचें कार्य जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिआ लवकरच सुरू करणार आहे. राज्यांतील अधिक जमिनीला पाणीपुरवठा करण्यासाठी विहिरी खोदणें कितपत शक्य आहे तें अजमावून पहाण्याचा उद्देश आहे.

### इतर किंमतींच्या मानानें रेल्वेभाडें वाढलें नाहीं

जवळ जवळ सर्व वस्तूंच्या किंमतींत झालेल्या भरमसाट भाववाढीशीं तुलना करतां गेल्या शंभर वर्षांत रेल्वेच्या भाड्यांत अगदीं बेताचीच वाढ झाल्याचें तत्संबंधीच्या आकडेवारीवरून दिसून येतें.

१८५३–५४ मध्यें जुन्या जी. आयू. पी. आणि ईस्ट इंडिया रेल्वेचें तिसऱ्या वर्गाचें भाडें दर उतारूमागें दर मैलीं ३ पै होतें. आज मेल आणि एक्सप्रेस गाड्यांना तें दर मैलीं ६ पै व इतर गाड्यांना दर मैलीं ५ पै आहे.

कांहीं जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतींत या काळांत पडलेला फरक पुढें दिला आहे.

| वस्तु | सुमारें १०० वर्षांपूर्वीचा दर | आजचा दर |
|---|---|---|
| तांदूळ | १ रु. १० आ. (मण) | १६ रु. १२ आ. (मण) |
| गहूं | २ रु. १२ आ. (मण) | १५ रु. १२ आ. (मण) |
| साखर | ९ रु. ४ आ. (मण) | २७ रु.——(मण) |
| कापसाचें सूत | ८ आ. ७ पै (रत्तल) | १ रु. १४ आ. ६ पै. (रत्तल) |
| रेल्वे भाडें | ३ पै (मैल) | ५ पै (मैल)<br>६ पै (मैल) |


## महाराष्ट्र सहकारी विद्यालय, पुणें १.

या विद्यालयाचे वर्ग दि. २ जुलै १९५३ पासून नं. ५ बैरामजी जिजिभाई रोड, पुणें १ येथें सुरू होणार आहेत. या विद्यालयांत सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, असिस्टंट को–ऑपरेटिव्ह ऑफिसर, खरेदी–विक्रीसंघाचे मॅनेजर व विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांचे सेक्रेटरी या दर्जाच्या नोकर–वर्गास लागणारें शिक्षण देण्यांत येतें. हा अभ्यासक्रम पुरा करून "को–ऑपरेटिव्ह डिप्लोमा" मिळणाऱ्यांना सहकारी खात्यांमध्यें नोकरीसाठी विशेष पसंति देण्यांत येते. मॅट्रिक पास झालेल्या विद्यार्थ्यांना व सहकारी खातें व संस्था येथील नोकर–वर्गास प्रवेश दिला जातो. विद्यालयांत मर्यादित विद्यार्थीच घ्यावयाचे असल्यानें प्रवेश घेऊं इच्छिणाऱ्या उमेदवारांनीं दि. १० जूनच्या आंत अर्ज करावे.

एन्. पी. रणभिसे,
सुपरिंटेंडेंट.



—: महाराष्ट्राची अग्रेसर कंपनी :—

## दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कंपनी लि.

पहिल्याच मूल्यमापनांत बोनस जाहीर करून, कंपनीनें असाधारण विक्रम करून दाखविला आहे. दुसऱ्या मूल्यमापनाचें काम चालू झालें असून, त्यांत निश्चित प्रगति दिसेल अशी खात्री वाटते.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर




## किर्लोस्कर



हातपंप

उन्हाळी पिकासाठीं व घरगुती पाणी पुरवठ्यासाठीं खात्रीची उपाय योजना.



सेंट्रिफ्युगल पंप

विशेष माहितीसाठीं लिहा.

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी जि. सातारा



## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,१९,४८५ |
| खेळतें भांडवल | रु. ७५,००,००० |

मुंबई शाखाः–कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. डा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

# THE BHARAT INDUSTRIAL BANK LIMITED, POONA CITY.

*Balance Sheet as on 31st December 1952*

CAPITAL AND LIABILITIES

| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Capital** | | |
| **Authorised Capital** | | |
| 1,089 6% Cumulative (Redeemable after 5 years) Preference Shares of Rs. 40/- each ... | 43,560—0—0 | |
| 30,005 Ordinary Shares of Rs. 50/- each ... | 15,00,250—0—0 | 15,43,810—0—0 |
| **Issued and Subsribed Capital** | | |
| 1,089 6% Cumulative (Redeemable after 5 years) Preference Shares of Rs 40/- each ... | 43,560—0—0 | |
| 15,005 Ordinary Shares of Rs. 50/- each ... | 7,50,250—0—0 | 7,93,810—0—0 |
| **Called and Paid up Capital** | | |
| 1,089 6% Cumulative (Redeemable after 5 years) Preference Shares @ Rs. 25/- each ... | 27,225—0—0 | |
| 15,005 Ordinary Shares @ Rs. 25/- each ( out of which 5 Shares are fully paid ) ... | 3,75,250—0—0 | |
| | 4,02,475—6—0 | |
| Less calls unpaid ... | 2,320—0—0 | |
| | 4,00,155—0—0 | |
| Add Forfeited Shares ... | Nil | 4,00,155—0—0 |
| **Calls in Advance** | | 290—0—0 |
| **2. Reserve Fund and other Reserves** | | 75,500—0—0 |
| **3. Deposits and other Accounts** | | |
| Fixed deposits ... | 17,74,333—0—0 | |
| Savings Bank Deposits ... | 17,50,993—12—0 | |
| Current Accounts, Contingency Accounts etc. ... | 11,45,328—11—10 | 46,70,655—7—10 |
| **4. Borrowings from other Banking Companies, Agents, etc.** | | |
| ( i ) In India ... | 5,52,501—9—8 | |
| ( ii ) Outside India ... | Nil | 5,52,501—9—8 |
| **Particulars** | | |
| ( i ) Secured (against Pledge of G.P.Notes) Rs.5,52,501—9—8 | | |
| ( ii ) Unsecured Nil ... | | |
| **5. Bills Payable** | | 7,906—11—9 |
| **6. Bills for collection being Bills Receivable ( As per contra )** | | |
| ( i ) Payable in India ... | 1,12,833—15—5 | |
| ( ii ) Payable outside India ... | Nil | 1,12,833—15—5 |
| **7. Other Liabilities** | | 52,809—11—5 |
| **8. Acceptances, Endorsements and Other Obligations per Contra** | | Nil |
| **9. Profit and Loss Account** | | |
| Profit as per last Balance-Sheet ... | 36,145—15—5 | |
| Less appropriations : | | |
| Reserve Fund 10,000—0—0 ... | | |
| Provision for Income-tax 11,000—0—0 ... | | |
| Dividend on 6% Preference Shares 1,633—8—0 ... | | |
| Dividend @ 3% on Ordinary Shares 11,257—8—0 ... | | |
| Investment Depreciation Fund 2,000—0—0 ... | 35,891—0—0 | |
| | 254—15—5 | |
| Add Profit for the year brought from the Profit and Loss Account ( subject to taxation ) ... | 20,780—10—11 | 21,035—10—4 |
| **10. Contingent Liabilities** | Nil | Nil |
| Grand Total Rs. ... | | 58,93,688—2—5 |

( See Profit and Loss Account on Page 168 )

# THE BHARAT INDUSTRIAL BANK LIMITED, POONA CITY.

***Balance Sheet as on 31st December 1952.***

## PROPERTY AND ASSETS

| | | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| **1. Cash** | | | |
| In hand and with Reserve Bank and Imperial Bank (including foreign currency notes) ... | | | 5,22,699-14-3 |
| **2. Balances with other Banks (in current accounts)** | | | |
| (i) In India | | 2,74,619-2-2 | |
| (ii) Outside India ... | | Nil | 2,74,619-2-2 |
| **3. Money at Call and Short Notice** | | | Nil |
| **4. Investments (at cost)** ... | | | |
| Govt. Securities of the face value of Rs.21,94,400/- (Average M. value Rs. 19,95,863-10-0) ... | | | |
| (i) Securities of the Central and State Governments and other Trustee securities, including Treasury Bills of the Central and State Governments ... | | 22,10,000-8-0 | |
| (ii) Shares-Ordinary shares of a Co-op. Bank, fully paid (at cost) ... | | 60-0-0 | |
| (iii) Debentures or Bonds ... | | Nil | |
| (iv) Other investments ... | | Nil | |
| (v) Gold ... | | Nil | 22,10,060-8-0 |
| **5. Advances (other than bad and doubtful debts for which provision has been made to the satisfaction of the auditors)** | | | |
| **(i) Loans, Cash Credits, Overdrafts etc.** | | | |
| (i) In India | 21,85,371-5-10 | | |
| (ii) Outside India | Nil | 21,85,371-5-10 | |
| **(ii) Bills Discounted and Purchased (excluding Treasury Bills of the Central and State Governments)** | | | |
| (i) Payable in India | 3,49,675-13-0 | | |
| (ii) Payable outside India | Nil | 3,49,675-13-0 | 25,35,047-2-10 |
| **Particulars of Advances** (*See Page 168*) | | | |
| **6. Bills receivable being bills for collection as per contra** | | | |
| (i) Payable in India ... | | 1,12,833-15-5 | |
| (ii) Payable outside India ... | | Nil | 1,12,833-15-5 |
| **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and Other Obligations per contra** | | | Nil |
| **8. Premises (at cost)** | | 78,853-10-0 | |
| Building Construction (at cost) ... | | 43,448-12-0 | |
| | | 1,22,302-6-0 | |
| Less Depreciation ... | | Nil | 1,22,302-6-0 |
| **9. Furniture and Fixtures (as cost)** ... | | 27,424-8-1 | |
| Additions during the year ... | | 1,117-4-3 | |
| | | 28,541-12-4 | |
| Less Depreciation upto 31-12-1951 | 4,424-8-1 | | |
| during the year | 417-4-3 | 4,841-12-4 | 23,700-0-0 |
| **10. Other Assets, Including Silver** | | | |
| Sundry Assets ... | | 5,565-11-0 | |
| Interest accrued on Govt. Securities ... | | 19,358-13-0 | |
| Advance payment of Income-Tax ... | | Nil | |
| Income-Tax deducted at source ... | | 17,103-3-0 | |
| Stock of Printing (at cost) ... | | 27,110-8-0 | |
| Library (at cost) Stamps and Advance to Staff ... | | 412-0-0 | |
| Due from Bank in liquidation (not provided for) ... | | 17,460-9-0 | |
| Branch Adjustments ... | | 5,414-5-9 | 92,425-1-9 |
| **11. Non-Banking Assets Acquired in Satisfaction of Claims** | | | Nil |
| Grand Total Rs. ... | | | 58,93,688-2-5 |

(See Profit and Loss Account on Page 168)

# THE BHARAT INDUSTRIAL BANK LIMITED, POONA CITY.

**Particulars of Advances Referred to on the assets side of the Balance Sheet as at 31-12-1952 on page 167**

| | Rs. As. Ps. |
|---|---|
| (1) Debts considered good in respect of which the Banking company is fully secured | 16,45,010—4—0 |
| (2) Debts considered good for which the Banking company holds no other security than the debtors' personal security ... | 1,97,155—3—4 |
| (3) Debts considered good secured by the personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the debtors ... | 6,92,881-11—6 |
| (4) Debts considered doubtful or bad, not provided for | Nil |
| | 25,35,047—2—10 |
| (5) Debts due by directors or officers of the Banking company or any of them either severally or jointly with any other persons ... | 1,70,840—7—0 |
| (6) Debts due by companies or firms in which the directors of the Banking company are interested as directors, partners or managing agents or in the case of private companies, as members ... | 1,47,372—9—3 |
| (7) Maximum total amount of advances, including temporary advances made at any time during the year to directors or managers or officers of the Banking company or any of them either severally or jointly with any other persons ... | 1,83,165—0—2 |
| (8) Maximum total amount of advances including temporary advances granted during the year to the companies or firms in which the directors of the Banking company are interested as directors, partners or managing agents or, in the case of private companies as members ... | 4,80,656-13—6 |
| (9) Due from banking companies | |

***Profit and Loss Account for the Year ending 31st December 1952***

| EXPENDITURE | Rs. As. Ps. | INCOME (Less Provision Made during the year for bad and doubtful debts and other usual or necessary provisions) | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| 1 Interest paid on deposits, borrowing etc. ... | 1,28,242—0—4 | 1 Interest and Discount: ... | 2,64 714—6-8 |
| 2 Salaries and Allowances and Provident fund: (including amount paid to Managing Directors Rs.15,347-8-0) | 91,197—2—0 | 2 Commission, Exchange and Brokerage ... | 10,676-15-6 |
| 3 Directors' and Local Committee members' fees and allowances ... | 3,335—0—0 | 3 Rents | 464—4-0 |
| 4 Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. | 8,335—2—9 | 4 Net Profit on sale of investments, gold and silver, land, premises and other assets (not credited to Reserves or any particular Fund or Account) | Nil |
| 5 Law Charges ... | 1,058—5—0 | | |
| 6 Postage, Telegrams and Stamps ... | 5.188-10—6 | | |
| 7 Auditors' Fees | 700—0—0 | 5 Net Profit on revaluation of investments, gold and silver, land, premises and other assets (not credited to Reserves or any particular Fund or Account) ... | Nil |
| 8 Depreciation on and Repairs to the Banking company's Property ... | 417—4—3 | | |
| 9 Stationery, Printing, Advertisement, etc. ... | 6,819-11—0 | 6 Income from non-banking assets, and profit from sale of or dealing with such assets. ... | Nil |
| 10 Loss from sale of or dealing with non-banking assets ... | Nil | | |
| 11 Other Expenditure: ... | 15,802—1—9 | 7 Other receipts: ... | 6,020—6-4 |
| 12 Balance of Profit (Subject to Taxation ... | 20,780-10-11 | | |
| Total Rs ... | 2,81,876—0—6 | Total Rs. ... | 2,81,876—0-6 |

M. K. Ternikar,
*Accountant*

N. N. Kshirsagar,
R. B. Salvekar,
*Managing-Directors.*

B. B. Walvekar, *Chairman.*
K. P. Joshi, *Vice-Chairman.*

Mrs. Indumatibai R. Phadke,
B. P. Kelkar,
K. M. Mahajan,
R. P. Damodare.
} *Directors.*

## REPORT OF THE AUDITORS TO THE SHAREHOLDERS

We have examined the above Balance Sheet of the Bharat Industrial Bank Limited, as on 31st December, 1952, and the annexed Profit and Loss Account of the Bank for the year ended upon that date, in which are incorporated the authenticated returns from Branches and report that:—

(1) We have obtained all the information and explanations, we have required. (2) In our opinion, the above Balance Sheet and Profit and Loss Account are drawn in conformity with the law. (3) Such Balance Sheet exhibits a true and correct view of the state of the Bank's affairs according to the best of our information and explanations given to us and as shown by the books of the Bank. (4) In our opinion the Books of Account have been kept by the Bank as required by Sec. 130 of the Indian Companies Act 1913. (5) The information and Explanations required by us have been found to be satisfactory. (6) The transactions of the Bank which have come to our notice have been within the powers of the Bank. (7) The returns received from Branch offices of the Bank have been found adequate for the purposes of the Audit. (8) The Profit and Loss Account shows a true balance of Profit and Loss for the period covered by such account.

Poona,
Date 30th January 1953.

Khare & Co.
*Chartered Accountants.*

(See Balance Sheet on Page 166 and 167)

## शेड्यूल्ड बँकांच्या उत्पन्न-खर्चाची तुलना

### १९४६ ते १९५१

सर्व बँकांचे एकत्रित आकडे पाहिले, तर त्या सर्व बँकांचें एकूण उत्पन्न १९५० सालीं ४० कोटी रु. होतें, तें १९५१ मध्यें ४७ कोटी रु. झालें. एकूण उत्पन्नापैकी ६०% उत्पन्न बिल्स व कर्जे ह्यांवरील व्याजापासून मिळालें व २०% उत्पन्न इन्व्हेस्टमेंटवरील व्याजापासून मिळालें. एकूण उत्पन्नाच्या ३४% इतका एस्टॅब्लिशमेंट खर्च आला.

शेड्यूल्ड बँकांपुरता विचार केला, तर त्यांचें उत्पन्न १९४६ मध्यें २७ कोटी रु. होतें, तें १९४७ ते १९५० अखेर ३० कोटींच्या घरांत राहिलें. १९५१ मध्यें बँकांनीं दिलेल्या कर्जांत झालेल्या वाढीमुळें तें ३२.२ कोटी रुपयांवर गेलें. एक्सचेंज बँकांचें उत्पन्न १९४९ मध्यें ११.२ कोटी रु. होतें, तें १९५० मध्यें घटून ९.५ कोटी रु. झालें पण १९५१ मध्यें तें १३.१ कोटी रुपयांवर गेलें.

दोन्हीं प्रकारच्या शेड्यूल्ड बँकांपैकी एक्सचेंज बँकांना बिल्स व कर्जे ह्यांवरील व्याजापासून ज्यास्त प्रमाणांत उत्पन्न मिळालें, ह्याचें कारण त्यांनीं दिलेल्या कर्जांचें ठेवींशीं प्रमाण १०३% होतें, तर हिंदी शेड्यूल्ड बँकांच्या बाबतींत तें ५९% होतें. "फॉरिन बिल्स परचेस्ड अँड डिस्कौंटेड" ह्या सदराखालील उत्पन्नहि त्यांचें बाबतींत मोठें होतें. सरकारी रोख्यांवरील व्याजाचें उत्पन्न हिंदी शेड्यूल्ड बँका पूर्वी बरेंच मिळवीत असत. १९४६ मध्यें तें एकूण उत्पन्नाच्या ३८% होतें; १९५० सालीं तें २८% झालें व १९५१ मध्यें तर तें २१% वर उतरलें. बँकांनीं सरकारी रोखे विकून टाकले, त्यामुळें त्याच्या व्याजाच्या उत्पन्नाच्या रकमेंत घट होत गेली, परंतु बँकांचें एकूण उत्पन्न मात्र वाढत होतें. एक्सचेंज बँकांच्या बाबतींत असा कांहीं फरक आढळला नाहीं.

हिंदी शेड्यूल्ड बँकांच्या बाबतींत उत्पन्नाचा फार मोठा भाग एस्टॅब्लिशमेंट खर्चानें खाल्ला. त्याच्या प्रत्यक्ष खर्चाचा आकडा व त्याचें प्रमाण हीं एकसारखीं वाढत गेलीं. १९४६ सालीं ७.० कोटी रु. (२६%), तर १९५१ सालीं १२.० कोटी रु. (३७%) असे ते आकडे व प्रमाणें होतीं. १९४६ नंतर उत्पन्नांत होत गेलेली वाढ एस्टॅब्लिशमेंट खर्चानें गिळून टाकली. बहुतेक एक्सचेंज बँकांच्या एस्टॅब्लिशमेंट खर्चाचें त्यांच्या एकूण उत्पन्नाशीं प्रमाण १९५१ मध्यें २६% पडलें. हिंदी शेड्यूल्ड बँकांची दुसरी खर्चाची बाब म्हणजे ठेवींवर व कर्जांवर त्यांनीं दिलेलें व्याज, ही होय. १९४६ मध्यें व्याजाची ही रक्कम एकूण उत्पन्नाच्या २८.५% होती. १९४७ सालीं ती २७.७% झाली, १९५० मध्यें ती २३.५% झाली व १९५१ मध्यें २३.६% राहिली. ठेवींतील घटीचा हा परिणाम आहे.

हिंदी शेड्यूल्ड बँकांचा निव्वळ नफा एकसारखा घटत गेला. (१९४७:९.४ कोटी रु., १९४९:९.२ कोटी रु., १९५०: ६.६ कोटी रु.). वसुलीची अडचण आणि घसाऱ्याची वाढती तरतूद ह्यांचा तो परिणाम होता. १९५१ मध्यें निव्वळ नफा ७.५ कोटी रु. झाला. ८१ लक्ष रुपयांची घसाऱ्याची तरतूद करूनहि एवढा नफा झाला, त्याचें कारण उत्पन्नच वाढलें हें होय. एक्सचेंज बँकांना १९४९ मध्यें ४.६ कोटी रु, १९५० मध्यें ३.३ कोटी रु. व १९५१ मध्यें ५.५ कोटी रु. नफा झाला.

### बँकांचें उत्पन्न व खर्च, १९४६ ते १९५१

(आकडे लक्ष रुपयांचे)

| | | उत्पन्न | | | खर्च | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वर्ष | बिल्स व कर्जें ह्यांपासून | इन्व्हेस्टमेंटस्-पासून | एकूण उत्पन्न | एस्टॅब्लिशमेंट खर्च | ठेवी, कर्जें, इ. वरील व्याज | एकूण खर्च | निव्वळ नफा |
| हिंदी शेड्यूल्ड बँका | १९४६ | १२,३५.२ | १०,७१.१ | २७,२६.४ | ६,९८.८ | ७,७८.३ | १७,९०.३ | ९,३६.१ |
| | १९४७ | १४,७४.९ | १०,११.१ | २९,८३.४ | ८,६२.७ | ८,२८.३ | २०,६४.९ | ९,१८.५ |
| | १९४८ | १४,७७.१ | १०,३०.५ | २९,७३.४ | ९,५०,१ | ७,६०.३ | २१,६६.१ | ८,०७.३ |
| | १९४९ | १५,६६.२ | ८,४५.८ | २९,६२,४ | १०,३९.२ | ७,२०.६ | २१,७४.४ | ७,८८.० |
| | १९५० | १५,१३.५ | ८,९५.२ | २९,१०.२ | ११,२४.८ | ६,८३.१ | २२,५१.८ | ६,५८.४ |
| | १९५१ | १८,१६,४ | ७,७३.५ | ३२,२८.० | ११,९८.६ | ७,५९.५ | २४,७७,१ | ७,५०.९ |
| बिगर-शेड्यूल्ड बँका (वसूल भांडवल अधिक रिझर्व्ह ५ लक्ष रु. वर असलेल्या) | १९४६ | ९९.१ | ४८.९ | १,७६.१ | ३३.८ | ६८.१ | १,२६.५ | ४९.६ |
| | १९४७ | १,१८.६ | ४३.८ | १,८२.६ | ३८.० | ७७.५ | १,४४.० | ३८.६ |
| | १९४८ | १,४६.३ | ४६.४ | २,०७.१ | ४६.८ | ८४.४ | १,६३.६ | ४३.५ |
| | १९४९ | १,५२.५ | ४८.६ | २,१६.८ | ५६.३ | ७९.२ | १,७४.२ | ४२.६ |
| | १९५० | १,३०.१ | ४०.२ | १,८४.६ | ५०.४ | ७०.५ | १,५८.८ | २५.८ |
| | १९५१ | १,४१.० | ३४.१ | १,९३.० | ५२.६ | ७९.९ | १,७०.२ | २२.८ |
| एक्सचेंज बँका | १९४९ | ६,९६.४ | १,२९.१ | ११,२३.४ | २,८८.९ | २,५०.० | ६,७१.६ | ४,५७,८ |
| | १९५० | ६,३२.७ | १,२४.६ | ९,४६.९ | ३,०७.४ | १,४९.५ | ६,१२,७ | ३,३४,२ |
| | १९५१ | ८,८४.४ | १,२८.४ | १३,०६.५ | ३,४१.१ | २,२६.७ | ७,५२.४ | ५,५४.१ |
| सर्व बँका | १९४९ | २४,१५.१ | १०,२३.५ | ४३,०८.६ | १३,७७.४ | १०,४९.८ | ३०,२०.२ | १२,८८.४ |
| | १९५० | २२,५६.३ | १०,६०.० | ४०,४१.७ | १४,८२.६ | ९,०३.१ | ३०,२३.३ | १०,१८.४ |
| | १९५१ | २८,४१.८ | ९,३६.० | ४७,२७.५ | १५,९२.३ | १०,६६.१ | ३३,९९,७ | १३,२७.८ |

एकूण उत्पन्नाशीं निव्वळ नफ्याचें पडणारें प्रमाण पाहिलें, तर हिंदी शेड्यूल्ड बँकांच्या बाबतींत तें २३% व एक्सचेंज बँकांच्या बाबतींत ४२% पडतें.

चालू खर्चाचें (घसाऱ्याची तरतूद व जिंदगी विकून आलेला तोटा वगळून बाकीचा खर्च) एकूण उत्पन्नाशीं (पूर्वी लिहून टाकलेल्या येण्याची झालेली वसुली वगळून) प्रमाण १९४९, १९५० व १९५१ ह्या तिन्ही वर्षी हिंदी शेड्यूल्ड बँकांच्या बाबतींत भारी (अनुक्रमें ७३·६%, ७५·३%, व ७४·१%) होतें. एक्सचेंज बँकांचीं तींच प्रमाणें ५९·०%, ६२·९% व ५५·४% होतीं. एक्सचेंज बँकांना तौलनिक दृष्ट्या कर्जे व विलें ह्यांपासून अधिक प्राप्ति होते, त्या व्याज कमी देतात (त्यांच्या ठेवींपैकी ६६% रकम चालू खात्यावर, जवळ जवळ बिन-व्याजी असते. हिंदी शेड्यूल्ड बँकांत हें प्रमाण ५१% असतें; त्या व्याज ज्यास्त देतात), आणि त्यांच्या भारतांत शाखा कमी असल्यानें ओव्हर-हेड चार्जेस त्यांचे कमी असतात, त्याचा हा परिणाम आहे.

---

### कोलंबो योजनेखालीं तांत्रिक सहकार

कोलंबो योजनेखालील तांत्रिक सहकार-योजना सुरू झाल्यापासून १९५२ पर्यंत एकूण १७,००,००० पौंड खर्चून १३५ तज्ज्ञांची मदत देण्यांत आली व ८४७ विद्यार्थ्यांच्या तांत्रिक शिक्षणाची व्यवस्था करण्यांत आली.

दिलेल्या १३५ तज्ज्ञांपैकीं ४५ सीलोनला, ४२ पाकिस्तानला, ३३ भारताला, १२ मलाया फेडरेशनला, ३ उत्तर बोर्नियोला आणि १ सिंगापूरला असे धाडण्यांत आले. तांत्रिक शिक्षण मिळालेले देशवार खालीलप्रमाणें आहेत. ३०१ भारती, २१५ पाकिस्तान, १७३ सीलोन, ६२ इंडोनेशिया, ३९ मलाया फेडरेशन, १३ थायलंड, ११ फिलीपाइन्स, ९ सारावाक, ७ सिंगापूर, ६ नेपाळ, ६ उत्तर बोर्नियो आणि ५ ब्रह्मदेश.

तज्ज्ञांपैकीं ६७ इंग्लंडचे, ४० ऑस्ट्रेलियाचे, १७ न्यूझीलंडचे, ६ कॅनडामधील व ५ भारतीय होते. तांत्रिक शिक्षणाच्या सोयी पुढील राष्ट्रांतून झाल्या. (कंसांतील आंकडे किती जगांची व्यवस्था केली त्याचे) ऑस्ट्रेलिया (२८६), इंग्लंड (२७९), न्यूझीलंड (११९), कॅनडा (१०६), भारत (५६) आणि पाकिस्तान (१).

प्रथमतः ही योजना ३० जून, १९५३ पर्यंत चालावयाची असें ठरलें होतें. परंतु ३१ डिसेंबर, १९५१ पर्यंत या कार्यासाठी बाजूला काढलेल्या ८० लक्ष पौंडापैकी अवघे ४ लक्ष पौंड प्रत्यक्षांत खर्ची पडले. म्हणून ही सहकार योजना कोलंबो योजनेच्या मुदतीपर्यंत चालावी पण सदस्य राष्ट्रांना आणखी पैसा द्यावा लागूं नये असें ठरलें. म्हणजे, एकूण ८० लक्ष पौंडांच्या खर्चाची ही योजना आतां ३० जून, १९५७ पर्यंत चालेल.

या ८० लक्ष पौंडांच्या खर्चाची जबाबदारी पुढीलप्रमाणें विभागलेली आहे. सीलोन (४ लक्ष पौंड), भारत (७॥ लक्ष पौंड), न्यूझीलंड (४ लक्ष पौंड), पाकिस्तान (१ लक्ष ६१,२९० पौंड). ऑस्ट्रेलिया व इंग्लंड यांनीं प्रत्येकीं एकूण रकमेच्या ३५ टक्के द्यावयाचें ठरविलें आणि इंग्लंडनें त्याप्रमाणें २८ लक्ष पौंड दिले. कॅनडाचा वांटा दरवर्षी ठरतो आणि पहिल्या दोन वर्षांत कॅनडानें प्रतिवर्षी ४ लक्ष डॉलर दिले.

### ब्रिटिश वृत्तपत्रांना लागलेली नवी चिंता

ब्रिटनमधील वृत्तपत्रांना एका नव्या चिंतेनें व्यग्र केलें आहे. रेडिओ आणि टेलिव्हिजन ह्यांचा उपयोग जाहिरातदार अधिक प्रमाणांत करूं लागल्यामुळें ही चिंता उत्पन्न झाली आहे. जाहिरातींच्या ह्या नव्या प्रकारांत परदेशीय रेडिओ आणि टेलिव्हिजन ह्यांनीं पुरस्कारिलेल्या जाहिरातीहि येतात. अजून अशा प्रकारच्या जाहिरातींनीं सर्वच क्षेत्र व्यापलें नसलें तरी हा काळ फारसा दूर नाहीं असें वाटूं लागलें आहे. लंडनमध्यें जाहिरातींचा व्यवसाय करणाऱ्यांच्या दोन प्रमुख संघटना आहेत. संघटनांच्या तज्ज्ञांनीं असा अंदाज केला आहे, कीं रेडिओचा आणि टेलिव्हिजनचा जाहिरातींसाठी मोठ्या प्रमाणावर उपयोग होऊं लागल्यावर त्यांच्यापायीं दरवर्षी ६०,००,००० ते ८०,००,००० पौंड खर्च होऊं लागतील. हा पैसा कोठून येणार असा प्रश्न उत्पन्न होतो. वृत्तपत्राच्या चालकांना अशी भीति वाटते कीं एरवीं जो पैसा वृत्तपत्रें आणि मासिकें ह्यांच्यांतील जाहिरातींवर खर्च व्हावयाचा त्यांतूनच वरील पैसा खर्च करण्यांत येईल. ज्या कंपन्या जाहिराती देतात त्यांच्या मालाची विक्री जास्त झाली तरच त्यांना वृत्तपत्रांतील जाहिराती परवडतील असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे. ब्रिटनमध्यें दरवर्षी सुमारें ८,००,००,००० ते ९,७०,००,००० पौंड वृत्तपत्रांतील जाहिरातींवर खर्च होतात. त्यापैकी २,८०,००,००० पौंड लंडनमधील वृत्तपत्रांना मिळतात. २,३०,००,००० पौंड ब्रिटनमधील प्रांतिक वृत्तपत्रांना मिळतात आणि १,८०,००,००० पौंड मासिकांना मिळतात. रेडिओवरील आणि सिनेमांतील जाहिरातींवर अवघा १,६०,००,००० पौंड खर्च होतो. टेलिव्हिजनवरील जाहिरातींचा अमेरिकेंत सध्यां खूपच प्रसार झाला आहे. परंतु तेथील वृत्तपत्रांनीं त्याविरुद्ध ओरड केल्याचें ऐकिवांत नाहीं. ब्रिटनमधील वृत्तपत्रांनाच जाहिरातींचा नवा प्रकार का बोचावा, असा प्रश्न सहजच उपस्थित होतो.

---

**गव्हाच्या पैशाचा विनियोग**—कोलंबो मदत योजनेप्रमाणें भारताला कॅनडाकडून कांहीं गहूं मिळाला होता. त्या गव्हाची विक्री करून जो पैसा उभा राहील त्याचा विनियोग प. बंगालमध्यें पाटबंधाऱ्याचीं नवीं कामें बांधण्यासाठी करण्यांत येणार आहे. आर्थिक विकासाच्या कामासाठीच हा पैसा वापरण्यांत यावा अशी अट कॅनडाच्या सरकारनें घातली होती. गहूं विकून सुमारें ७·५ कोटी रुपये आले.

**अमेरिकेच्या बोलपटांची किंमत:**—१९५१ सालीं भारतानें अमेरिकेकडून आणलेल्या बोलपटांसाठी ३८·२६ लाख रुपये भाड्यासाठी म्हणून द्यावे लागले. गेल्या वर्षी ३१·७२ लाख रुपये अमेरिकेला धाडण्यांत आले. ह्याच दोन वर्षांत ब्रिटनला बोलपटांचें भाडें म्हणून अनुक्रमें २·३५ लाख व ०·२९ लाख रुपये पाठविण्यांत आले.

**सिनेमा तिकिटावरील कर कमी करा**—अमेरिकेच्या बोलपट व्यावसायिकांनीं सरकारला अशी विनंति केली आहे कीं, सिनेमाच्या तिकिटावरील कर २० टक्क्यांनीं कमी करण्यांत यावा. ह्या करामुळें युद्धोत्तर काळांत ४,५०० सिनेमागृहें बंद पडलीं असून करभार कमी झाला नाहीं तर पुढील दोन वर्षांत आणखी २,५०० सिनेमागृहें बंद पडतील अशी भीति त्यांनीं व्यक्त केली आहे. १९४६ सालीं कर वजा जातां धंद्याला १८,७०,००,००० डॉलर्स उत्पन्न झालें होतें. गेल्या वर्षी अवघे ३,१०,००,००० डॉलर्स उत्पन्न झालें.

१९५० अखेरचें ११ वें यशस्वी मूल्यमापन

१९५० मध्येंही रु. २६५ लाखांवर नवीन विम्याचें पूर्ण काम.

**वे स्ट र्न इं डि या**

विमा कंपनीनें

आपलें सामर्थ्य, स्थैर्य व सेवा

यासंबंधींची प्रचिती पुन्हां एकवार विमा जगतास आणून दिली आहे.

दर हजारी त्रैवार्षिक बोनस

| हयातींतील पॉलिसी | हयातीनंतरची पॉलिसी |
|---|---|
| रु. २७ | रु. ३३ |

कंपनीच्या वाढत्या वैभवांत सहभागी व्हा व सर्वोत्कृष्ट फायद्यासाठी

वेस्टर्न इंडियाची निवड करा.

के. वाय. जोशी, बी. ए., एफ. आय. ए.

मॅनेजर

# वेस्टर्न इंडिया लाईफ

## इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा.

शाखा कचेरीः— शहर: १७९ बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणें. कँप: केअर–ऑफ क्रेसेंवेल्स ईस्ट स्ट्रीट, पुणें–१

फोन नंबर— ३४०२



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) ||| श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |

एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.



# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम. ए., एलएल. बी. — श्री. बा. ग. चंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन. व्ही. पांडव, मॅनेजर



# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

—पुणें शहर—

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

भोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जे देणें, सोनें–चांदीचे तारणावर कर्जे देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

अेक ते दहा वर्षे मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.

१ वर्ष २ टक्के, २ वर्षे २॥ टक्के, ५ वर्षे ३ टक्के, ७ वर्षे ३॥ टक्के, १० वर्षे ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यात येतात.

दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्यासेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस् व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. खडे, मॅनेजिंग डायरेक्टर.

## . दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९, वेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

स्थापना १९११

टेलिफोन नं. २५४६१, ३१,६८६ | पोस्ट बॉक्स नं. ४७२, तारेचा पत्ता : फार्मरबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगांसाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | | |
| भागीदारांतर्फे | रु. ३३,१५,४०० | |
| मुंबई सरकारतर्फे | रु. २६,००,००० | |
| | रु. | ५९,२५,४०० |
| गंगाजळी व फंड | रु. | ४३,२८,९०० |
| ठेवी | रु. | ८,५४,८१,४०० |
| खेळतें भांडवल | रु. | १०,८५,०२,२०० |

### १९ जिल्ह्यांत ६३ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पु. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

## पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.

तारेचा पत्ताः—सॅनको सोप. टेलिफोन नं. ३११५

( जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था )

### संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक, सल्फेट व इतर खतें, पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.

★शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वांटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धांवपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

## दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली ).

स्थापना : १९४३

★

मुख्य कचेरीः भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | १,०८,४०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—यथावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन
श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा,
B. Com., C. A. I. I. B.
मॅनेजर

## बँक ऑफ पूना लि.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें : | २५,००,००० |
| वसूल भांडवल : | १२,५०,००० |

### —संचालक मंडळ—

१ श्री. मुरलीधर चतुर्भुज लोया, चेअरमन
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी.
३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर M. A. Ph. D. संपादक, सकाळ, पुणें.
४ श्री. फ्रामजी पी. पोचा, बियांचे व्यापारी.
५ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी
६ श्री. गणपतराव काळूराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

शाखा—(१) भवानी पेठ, पुणें. (२) सदाशिव पेठ, पुणें. (३) सोलापूर (४) सांगली.

व्याजाचे दर–चालू ठेव १/२ टक्का. सेव्हिंग्ज १॥ टक्का.

मुदत ठेव : १ वर्ष ३ टक्के, ५ वर्षें ४ टक्के.

एक वर्षापेक्षा कमी मुदतीच्या ठेवींवर आकर्षक व्याज.

मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत लॉकर्सची सोय.

मुख्य ऑफिस : ३५५ रविवार, पुणें २.

गो. गं. साठे, मॅनेजर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.